## एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (जिल्हा कक्ष), महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, नांदेड.

### विभागांतर्गत राबविण्यांत येणा-या विविध योजनांची संक्षिप्त माहिती-

#### 1. लेक लाडकी योजना-

मुलींच्या सक्षमीकरणासाठी दिनांक- 01 एप्रिल 2023 रोजी व त्यानंतर जन्मास येणा-या मुलींसाठी लेक लाडकी योजना राबविण्यांत येत आहे. (महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- एबावि- 2022/ प्र.क्र. 251/का. 6 दिनांक- 30 ऑक्टोबर 2023).

अ. योजनेची उद्दीष्ठे-

1. मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढविणे.
2. मुलींच्या शिक्षणास चालना देणे.
3. मुलींचा मृत्यू दर कमी करणे व बालविवाह रोखणे,
4. कुपोषण कमी करणे,
5. शाळाबाह्य मुलींचे प्रमाण 0 (शुन्य) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे.

ब. लाभाचे टप्पे-

| अ. क्र. | लाभाचा टप्पा | लाभाची रक्कम रूपये | आवश्यक कागदपत्रे. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | जन्मत: | 5000/- | खालील दिलेल्या ड- मधील अ.क्र.- 01 ते 02,04 ते 07 व 11 ते 12. |
| 2 | मुलगी पहिलीत गेल्यानंतर | 6000/- | आधारकार्ड व शिक्षण घेत असल्याबाबत शाळेचा दाखला (Bomafied) / शस्त्रक्रिया प्रमाणपत्र (दूस-या अपत्याच्या बाबतीत).. |
| 3 | मुलगी सहावीत गेल्यानंतर | 7000/- | शिक्षण घेत असल्याबाबत शाळेचा दाखला (Bomafied). / शस्त्रक्रिया प्रमाणपत्र (पहिल्या अपत्याच्या बाबतीत). |
| 4 | मुलगी अकरावीत गेल्यानंतर | 8000/- | शिक्षण घेत असल्याबाबत शाळेचा दाखला (Bomafied). |
| 5 | मुलीचे अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर | 75000/- | 1. अविवाहित असल्याबाबत लाभार्थी मुलीचे स्वयं घोषणापत्र.<br>2. लाभार्थी मुलीचे मतदार यादीत नांव असल्याचा दाखला- मतदान ओळख पत्र. |
| - | एकूण लाभाची रक्कम- | 101000/- | - |

क. अटी व शर्ती-

1. ही योजना पिवळया व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक- 01 एप्रिल 2023 रोजी वा त्यानंतर जन्माला येणा-या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच, एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.
2. पहिल्या अपत्याच्या तिस-या हप्त्यासाठी व दुस-या अपत्याच्या दुस-या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता / पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
3. तसेच दुस-या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील मात्र त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

. . . 2 . . .

4. दिनांक- 01 एप्रिल 2023 पूर्वी एक मुलगी / मुलगा आहे व त्यानंतर जन्माला आलेल्या दुस-या मुलीस किंवा जुळया मुलींना ( स्वतंत्र ) ही योजना अनुज्ञेय राहील. मात्र माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.
5. लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.
6. लाभार्थींचे संयुक्त बँक खाते महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे.
7. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये- 01 लक्ष पेक्षा जास्त नसावे.
8. लाभार्थीच्या कूटूंबाकडे केशरी / पिवळे रेशनकार्ड असणे आवश्यक आहे.

ड. आवश्यक कागदपत्रे-

1. लाभार्थीचा जन्माचा दाखला (01 एप्रिल 2023 वा त्यानंतरचा जन्म असलेले).
2. कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला- (वार्षिक उत्पन्न रूपये- 01 लाखापेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.
3. लाभार्थीचे आधार कार्ड (प्रथम लाभाच्यावेळी ही अट शिथील राहील).
4. पालकांचे (आई व वडील यांचे) आधार कार्ड.
5. लाभार्थी मुलगी व तिच्या मातेचे संयुक्त खाते असलेल्या बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
6. रेशनकार्ड (पिवळे अथवा केशरी रेशन कार्डची रंगीत साक्षांकित प्रत).
7. मतदान ओळखपत्र (पहिल्या लाभाच्यावेळी पालकांचे व शेवटच्या लाभाकरिता 18 वर्ष पूर्ण झाल्यांनतर मुलीचे मतदार यादीत नाव असल्याचा दाखला).
8. संबधित टप्पावरील लाभाकरिता शिक्षण घेत असल्याबाबतचा संबंधित शाळेचा दाखला (Bonafied).
9. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र (पहिल्या अपत्याच्या तिस-या हप्त्यासाठी व दुस-या अपत्याच्या दुस-या हप्त्यासाठी).
10. अंतिम लाभाकरिता मुलीचा विवाह झालेला नसणे आवश्यक राहील, (अविवाहीत असल्याबाबत लाभार्थीचे स्वयंघोषणापत्र).
11. अपत्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.
12. तहसिलदार यांनी दिलेले रहिवासी प्रमाणपत्र.

इ. प्रस्ताव सादर करण्यांची पध्दत-

1. सर्व आवश्यक कागदपत्रांसह आपल्या नजीकच्या अंगणवाडी केंद्रात ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

फ. लाभ कसा मिळणार-

1. लाभाची रक्कम त्या- त्यावेळी / टप्यात प्रस्ताव अथवा आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर लाभार्थ्यांच्या (लाभार्थी मुलगी व आईच्या) संयुक्त खात्यावर थेट (DBT) जमा करण्यांत येईल.

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (जिल्हा कक्ष), महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, नांदेड.

1. मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण.

2. महिलांसाठी समुपदेशन केंद्र.

3. इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण.

4. आदर्श अंगणवाडी सेविका,मदतनीस,पर्यवेक्षिका यांना पुरस्कार देणे.

5. अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण.

**वैयक्तीक लाभाच्या योजनेसाठीचे निकष / अटी व शर्ती-**

1. मान्यता प्राप्त संस्थेमार्फत प्रस्ताव सादर करण्यांत यांवा.(प्रशिक्षण).
2. कमीत- कमी 07 वी पास मुलींना लाभ देण्यांत यांवा. (प्रशिक्षण).
3. नांदेड जिल्ह्याची रहिवाशी असावी. (ग्रा.से.प्रमाणपत्र).
4. कूटूंबाचे मागील वर्षाचे उत्पन्न रूपये- 1,20,000/- च्या आत असावे.
5. यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**1. अंगणवाडींना विविध साहित्य पुरविणे-**

सदर साहित्यामध्ये शैक्षणिक व बौध्दीक विकासाला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी,शारिरिक विकासासाठी आवश्यक खेळाचे साहित्य, शैक्षणिक तक्ते, चाईल्ड ट्रेकिंग सॉफटवेअर, प्रौढ वजनकाटे, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, इन्फैंटोमीटर, स्टेडीओमीटर, जलशुद्धीकरण यंत्रे टेबल खुर्ची, कपाटे, चप्पल स्टैंड, स्टील डिशेस, चमचे, ग्लास, सतरंजी, बस्करपट्टी. डिजिटल टिव्ही, संगणक, अंगणवाडीतील मुला/मुलींना गणवेश वाटप इ. साहित्य पुरविता येईल.

**02. कुपोषित मुलामुलींसाठी व किशोरवयीन मुलींसाठी गरोदर स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार-**

ग्रामीण भागातील अंगणवाडीचे कार्यक्षेत्रातील 6 महिने ते 3 वर्ष व 3 वर्षे ते 6 वर्षे वयोगटातील मुलामुलींना अंगणवाडीमार्फत आहार दिला जातो. या व्यतिरिक्त कुपोषित मुलांचे कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी विशेष आहार म्हणून प्रोटीन सिरप, प्रोटीन पावडर, मायक्रोन्युट्रीयंन्ट सप्लीमेंटेशन सिरपचा, मिनरल व्हिटामिन्सचा पुरवठा करण्यात यावा. तसेच स्थानिक उपलब्धतेनुसार दुध, सोयादुध, चिक्की, लाडू, अंडी,,गुळ शेंगदाणे इत्यादी पौष्टीक व प्रथिनयुक्त आहार तसेच गर्भवती स्तनदा माता व किशोरी मुलींसाठी लोहयुक्त गोळया देणेत याव्यात.किशोरवयीन म्हणजेच 13 ते 19 वयोगटातील दारिद्रय रेषेखालील शालेय / शाळाबाह्य मुलींना आवश्यक अशा आरोग्यविषयक साहित्याचे मोफत वाटप करण्यात बावे. (उदा. सॅनिटरी नॅपकीन इ.) उपरोक्त साहित्याचा पुरवठा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत होत असल्यास या योजनेमधून सदर साहित्याचा पुरवठा करण्यात येऊ नये.